एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

(स्वयं अर्थसहाय्यित)

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय

आयोजक

## मराठी विभाग

श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी (कॅम्प) द्वारा संचलीत

(भाषिक अल्पसंख्यांक (मारवाडी) दर्जा प्राप्त)

## तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सेनगांव जि. हिंगोली (महाराष्ट्र) - ४३१५४२




संयोजक

प्रा. डॉ. अंजली. द. टापरे

मराठी विभाग

समन्वयक

प्रा.उत्तम. पुं. सुपारे

मराठी विभाग प्रमुख

प्रा.श्रीपाद. ग. तळणीकर

प्र. प्राचार्य

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्या पुढील आव्हाने व उपाय

संपादक

**प्रा.यु.पी. सुपारे**

**मराठी विभाग प्रमुख**

**✻ प्रकाशक ✻**

प्र.प्राचार्य प्रा.एस.जी. तळणीकर

तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव

जि.हिंगोली

फोन : (०२४५६) २०२४६५, २५०४६२

www.toshniwalacs.com | E-mail : prin.taccs212@rediffmail.com

प्रथम आवत्ती : ०४ जानेवारी २०२०

ISBN : 978-1-79482-974-9

✻ मुद्रक ✻

महेश ऑफसेट, परभणी

मूल्य : २५०/-

या पुस्तकातील सर्व शोधनिबंध लेखकाची मौखिल परवानगी ग्राह्य धरूनच हे शोधनिंबंध एकत्रित करण्यात आले असून, त्या मतांशी संपादक व प्रकाशनक सहमत असतीलच असे नाही.

या पुस्तकाचे सर्व अधिकार प्रकाशनाधीन असून या पुस्तकातील कोणताही मजकूर, तक्ता किंवा तत्सम संकल्पना यांची कोणत्याही प्रकारे नकल करणे किंवा यांत्रिकी साधनांनी फोटो कॉपी, रेकॉर्डींग करणे कायद्याने गुन्हा असून असे आढळून आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल.

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | शिर्षक | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | **जागतिकीकरण : भाषा, साहित्य आणि संस्कृती** | प्रा.डॉ.मा. मा. जाधव | 9 |
| 2 | जागतिकिकरण आणि मराठी कविता : एक आकलन | प्रा. डॉ. वी. वी. खंदारे | 12 |
| 3 | जागतिकीकरणात मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाय | प्रा. डॉ. जयद्रथ जाधव, | 15 |
| 4 | मराठवाडी बोली अभ्यासाच्या दिशा | डॉ. विठ्ठल जंबाले | 21 |
| 5 | बदलत्या काळातील बोलीभाषा : आव्हाणे व उपाय | डॉ. वैजनाथ अनमुलवाड, | 23 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ.रेखा जगनाळे, | 27 |
| 7 | जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय | अस्मिता विश्वनाथ वांद्रे. | 34 |
| 8 | जागतिकीकरणाच्या युगात मराठी माध्यमातील मुलांना इंग्रजी बोलताना येत असलेल्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास | डॉ. शामसुंदर गुळभिले | 41 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | डॉ. सपना वाल्मीक सोनवणे | 50 |
| 10 | जागतिकीकरणाच्या वावटळीतील बलुतेदाराची व्यथा | | |
| 11 | मांडणारा कवी : अरुण काळे | प्रा.डॉ. यशपाल भिंगे | 53 |
| 12 | **जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव** | **प्रा. डॉ. डिगोळे विठ्ठलराव** | 53 |
| 13 | जागतिकीकरण आणि नव्वदीनंतरची मराठी कविता।। | डॉ. केशव पाटील | 59 |
| 14 | जागतिकीकरणानंतरच्या शैक्षणिक पडझडीची कविता : पोरगं शेकत बसलंय | प्रा.डॉ.संजय कसाब, | 65 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ. नवीन के. गिलबिले | 69 |
| 17 | जागतिकीकरण : मराठी भाषेची स्थिती, आव्हाने व उपाय | डॉ.रामकिशन नारायण दहिफळे | 72 |
| 18 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ. चंद्रकांत शेरखाने | 75 |
| 19 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.सुरेश शिंदे | 79 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ. राजेश धनजकर | 82 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा. डॉ. मुंढे संगीता | 85 |
| 22 | मराठी भाषेची सद्यःस्थिती आव्हाने आणि उपाय | प्रा.डॉ. शेषराव नाईकवाडे | 88 |
| 23 | जगतिकीकरण आणि आदिवासी लोकसाहित्य | प्रा. डॉ. पंडित शिंदे | 90 |
| 24 | 'तुडवण ' आणि शोषणाचे जागतिकीकरण | प्रा.डॉ. राम रौनेकर, | 94 |
| 25 | जागतिकीकरण आणि कादंबरी | प्रा.डॉ. पंडित रानमाळ, | 96 |
| 26 | जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ.प्रभाकर ना. कऱ्हाळे | 98 |
| 27 | जागतिकीकरणाच्या पाश्वृभूमीवर बदलती महानगरीय मराठी कविता | प्रा.डॉ. जगताप यु. एस. | 101 |
| 28 | जागतिकिकरणाचे संदर्भ अचुकपणे टिपणारी कविता महाजन यांचा 'ग्राफिटी वॉल': एक आकलन | प्रा. डॉ. शारदा कदम . डॉ. कविता लोहाळे | 104 |
| 29 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ.गजानन आनंता देवकर , | 107 |
| 30 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा. डॉ. गणपती मोरे | 111 |
| 31 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ.एल.डी.गलंडे | 113 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.कालीदास गुडदे | 116 |
| 33 | जागतिकीकरणआणिमराठीसाहित्य | प्रा. इंगळे के.एस. | 118 |
| 34 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ.शंकर विभुते | 123 |
| 35 | जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावरील कृषी जाणीवा | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | 125 |
| 36 | 2000 नंतरची मराठी ग्रामिण कादंबरी : एक अभ्यास | प्रा.कृष्णा काशिराम कोटकर | 128 |
| 37 | जागतिकीकरण आणि दलित कविता : एक अभ्यास | प्रा. मारोती गायकवाड | 132 |
| 38 | मराठी भाषेची सद्यःस्थिती, आव्हाने व उपाय नेहा | रतन बनसोडे | 137 |

# जागतिकीकरणाच्या युगात मराठी माध्यमातील मुलांना इंग्रजी बोलताना येत असलेल्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास

डॉ. शामसुंदर धोंडिराम गुळभिले
सहाय्यक प्राध्यापक, प्राणिशास्त्र विभाग,
वैष्णवी महाविद्यालय, वडवणी

प्रतिभा निळकंठराव गायकवाड (द्वितीय वर्ष)
राष्ट्रीय संत भय्युजी महाराज अध्यापक महाविद्यालय,
हट्टा ता. बसमत, जि. हिंगोली

माणूस हा सामाजप्रिय प्राणी आहे. माणूस हा समाजामध्ये राहत असल्यामुळे त्याला आपले विचार एकमेका पर्यंत पोहोचविण्यासाठी भाषेची देवाण–घेवाण करावी लागते. भाषा ही मानवाला मिळालेली एक देणगी आहे. मानवाचा विकास हा भाषेमुळेच झालेला आहे. आपल्या विचारांचा आणि भाषेचा असाधारण असा संबंध आहे. पूर्वी भाषेची निर्मिती झाली नव्हती. तेव्हा एकमेकांमध्ये संवाद साधण्यासाठी मानव संकेतांचा वापर करून आपले विचार, भावना व्यक्त करत होता. आजची परिस्थिती बदलली आहे. शिक्षणामुळे भाषेचा विकास झालेला आपल्याला दिसून येतो.

भारत हा बहुभाषिक देश आहे. राष्ट्रीय विकास साधण्यासाठी जशी हिंदी भाषा गरजेची आहे, तसेच जागतिक विकास, संबंध सुधारण्यासाठी इंग्रजी भाषेचा वापर होणे अपरिहार्य आहे. महाराष्ट्रात मराठीला आद्यस्थान, हिंदीला द्वितीय स्थान, व इंग्रजीला तृतिय स्थान देण्यात आले आहे. जगातील बरेचसे देश हे इंग्रजी मातृभाषा असलेले देश आहेत. जागतिक संबंध सुधारण्याच्या दृष्टिने सरकारने पावले उचलली आहेत. पहिली पासून इंग्रजी शिक्षण सक्तीचे करण्यामागे हा एकच हेतू आहे कि, तळागाळातील लोकांपर्यंत इंग्रजी पोहोचवून आपला, आपल्या देशाचा जागतिक विकास घडून यावा.

इंग्रजी भाषा परकीय समजली जाते, पण आज इंग्रजीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. इंग्रजीला जागतिक दर्जा देण्यात आलेला आहे.

भाषेचा विकास हा विद्यार्थ्यांच्या विकासावर अवलंबून आहे. मराठी शाळांमध्ये इंग्रजी भाषेचे ज्ञान खूप उशिरा म्हणजे पाचवी पासून सुरु केले जाते. काही वेळेस भाषेचे ज्ञान त्यांना पूर्ण मिळत नाही. काही ठिकाणी इंग्रजी शिक्षकांचा अभाव असतो. काहीना इंग्रजी कळत असते, पण बोलता येत नाही. शहरापेक्षा खेड्यात ही परिस्थिती फारच बिकट आहे. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना इंग्रजीचा अभ्यास करणे अवघड जाते. त्यामुळे ते आपले विचार स्पष्टपणे मांडू शकत नाहीत. लेखन, भाषण अशा मार्गांनी विद्यार्थी आपला व भाषेचा विकास घडवून आणू शकतो.

आज सर्वजण इंग्रजी शिक्षणाकडे धाव घेत आहेत. पण इंग्रजी शिकूनसुद्धा त्यांना इंग्रजीतून संभाषण करतांना समस्या येतात. इंग्रजी भाषा ही आंतरराष्ट्रीय भाषांना, राष्ट्रांना जाणणारी भाषा आहे, त्यामुळे भारताचे इतर देशांशी संबंध सुधारत आहेत आणि भारतानेही इंग्रजी ही भाषा स्वीकारली आहे.

भाषेवर आजूबाजूच्या परिसराचा, बोलीभाषेंचा परिणाम होतो. त्यामुळे विद्यार्थी अनेक चुका करतात. संभाषण ही एक कला आहे. संभाषणाचे शास्त्र बनले आहे. कोठे काय बोलावे? कसे बोलावे? याची एक ठराविक पद्धत आसते. याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला तर त्यांना इंग्रजी संभाषण करणे अवघड जाणार नाही. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा बोलताना कोणकोणत्या समस्या येतात याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

गरज :

इंग्रजी भाषा ही संपूर्ण भारतामध्ये तसेच संपूर्ण जगामध्ये एक महत्त्वाची भाषा आहे. इंग्रजी भाषा हे सर्वच क्षेत्रात महत्त्वाचे काम करीत आहे. कारण ही जागतिक भाषा बनलेली असल्यामुळे परस्पर संबंध वाढविण्यासाठी या भाषेचा उपयोग होतो. इंग्रजी भाषा शिकणे, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवणे ही आता काळाची गरज आहे. भाषेच्या अभ्यासासाठी फक्त शाळेतील पुस्तकात दिलेला अभ्यास पुरेसा नाही, तर त्यासाठी जे इंग्रजीतील वर्तमानपत्र, बातम्या ह्या माध्यमातून सुद्धा भाषेवर प्रभुत्व मिळविता येते.

महाराष्ट्रात मराठी मातृभाषा असल्यामुळे आपले विचार प्रकट करण्यात मराठीचा प्रभाव जास्त असतो. हेच कारण असते की, इंग्रजी बोलताना विद्यार्थी आपले विचार इंग्रजी भाषेत मांडू शकत नाहीत. त्यामुळे व्याकरणाच्या चुका होतात आणि त्या चुका न करणे हे संभाषणाच्या दृष्टिने फार आवश्यक आहे.

भाषेवर प्रभुत्त्व मिळविण्यासाठी संभाषण हे एक महत्त्वाचे साधन आहे. मौखिक रुपात आपले विचार प्रकट करण्याची पात्रता संभाषणातून प्राप्त होते. त्यामुळे संभाषणाची कला ही साधी, सरळ, शुद्ध असायला हवी. संभाषण करताना कुठे काय बोलावे? कसे बोलावे? व्याकरणदृष्ट्या शुद्ध बोलावे, हे माहित असणे आवश्यक आहे .

विद्यार्थ्यांच्या भाषा कौशल्यात सुधारणा आणण्यासाठी तसेच त्याला जे ज्ञान आहे, त्याला व्यवस्थित रूप देण्यासाठी संभाषणात येणाऱ्या अडचणी, समस्या दूर करणे अत्यंत आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांची सृजनक्षमता (Creativity) अस्खलीतपना (Fluency) यांच्यात संभाषणामुळे वृद्धी होते. तसेच साध्या, सोप्या भाषेत काय बोलावे ? ऑफिस, मित्र-मैत्रिणी, नातेवाईक, शाळा- कॉलेज, भाषण इत्यादी संभाषणात कोणते आदरार्थी (Respective) व नेमके (Perfect) शब्द वापरावेत, हे माहित होणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांचे विचार तसेच, त्यांची विचार प्रकट करण्याची क्षमता आणि बोलण्यात अस्खलितपना आणण्यासाठी संभाषण आवश्यक आहे. तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी इंग्रजी संभाषण आवश्यक आहे. इंग्रजी भाषेची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी आणि जगाबरोबर आपला विकास साधण्यासाठी इंग्रजी संभाषणाची कला अवगत असणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे.

**अभ्यासाचे महत्त्व :-**

शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अध्यापकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. इंग्रजी या भाषेने शिक्षण क्षेत्रातले बरेचसे स्थान व्यापलेले आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावरही या भाषेने आपले महत्त्व सिद्ध केले आहे. पहिली पासून इंग्रजी इथेच इंग्रजीचे महत्त्व आज सिद्ध झाले आहे.

भारत सरकारने ढहीशश डरपर्सीरसश त्रैंीींश्र स्वीकारला आहे. त्यानुसार आपल्या मायबोलीला प्रथम स्थान देण्यात आले, राष्ट्रभाषा हिंदीला द्वितीय स्थान देण्यात आले, तर इंग्रजीला तृतिय स्थान देण्यात आले. सर्वच राज्यांनी हा भाषेचा त्रैंीींश्र स्वीकारला आहे. त्यानुसार महाराष्ट्रात मराठीला पहिले, हिंदीला दुसरे, तर इंग्रजीला तिसरे स्थान देण्यात आलेले आहे. सर्वांनी आपल्या आवशकतेनुसार त्यात बदल करून लोकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कोणकोणते प्रयत्न केले पाहिजेत? तसेच त्यांच्यातील विकासासाठी कोणकोणत्या गोष्टीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे? याची चिकित्सा करणे आवश्यक आहे.

अजूनही शिक्षण क्षेत्रात अशा अनेक समस्या आहेत की, त्या सोडविल्या गेल्या नाहीत. बदलता समाज आणि शिक्षणात होणारी प्रगती यामुळे नवनवीन प्रश्न निर्माण होत आहेत. विद्यार्थी फक्त वाचायला शिकतो, परंतु त्याच्या विचार क्षमतेला चालना देणे आवश्यक आहे. तसेच आता ज्या नवनवीन कल्पना समोर येत आहेत, त्या सर्वांची ओळख करून देणे आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अंग म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे, म्हणजेच लिहिण्या, वाचण्या बरोबरच त्यांच्या भाषेवरील प्रभूत्व, त्याची विचार करण्याची क्षमता तसेच लिखाणातील भाषेचे प्रभुत्व या सर्वांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. आणि यासाठीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने या विषयाचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे .

शैक्षणिक अभ्यासक्रमानुसार पुस्तकातील आराखडे, तसेच त्यातील संकल्पना व्यावहारिक जीवनाशी सलग्न असणे आवश्यक आहे .अभ्यासक्रमामुळे सुद्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाला प्रोत्साहन मिळणे महत्त्वाचे आहे .

शिक्षण क्षेत्रात असाच महत्त्वपूर्ण विषयात येणाऱ्या समस्यावर संशोधनात्मक दृष्टीकोनातुन तसेच चर्चात्मक रीतीने अध्यापन कार्यात प्रगती करणे आवश्यक आहे.

The Union Minister said The government of India has accepted in principle that Indian language should now be adopted as media of education at all stages and in all subject including -griculture, Engineering, Law, Medicine and Technology म्हणूनच इंग्रजी भाषा शिकणे हे पहिलीपासून आवश्यक झाले आहे.

विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलताना अनेक अडचणी, समस्या येत असतात म्हणुन ह्या अडचणी, समस्या कोणत्या आहेत याचा शोध घेऊन, अभ्यास करून योग्य प्रकारे सोडविण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत या गोष्टीचे महत्त्व आहे.

**उद्दिष्टे :-**

इंग्रजी ही भाषा शालेय अभ्यासक्रमात तिसरी भाषा म्हणुन शिकविली आहे. ती परकीय भाषा आहे ज्यांना ती कठीण वाटते त्यांचा नित अभ्यास होत नाही. त्यामुळे त्यांचा उपयोग ते व्यावहारिक जीवनात करू शकत नाहीत. इंग्रजी भाषा विद्यार्थ्यांना व्यवस्थित यावी, विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलताना कोणत्या समस्या येतात याची नोंद व त्यावर उपाय शोधणे हा महत्त्वाचा उद्देश आहे. शालेय अभ्यासक्रमात भाषेचा विकास होणे अत्यंत महत्त्वाचा आहे. आणि भाषा विषयात संभाषणात सुद्धा फार महत्त्व आहे, मग ती भाषा मराठी असो वा इंग्रजी असो. भाषेवर प्रभुत्त्व मिळवण्यासाठी, तसेच आपले विचार सुसज्ञपणे, तसेच व्यवस्थित स्वरूपात व्यक्त करण्याच्या दृष्टिने, विद्यार्थ्यांची रचानाक्षमता वाढविण्यासाठी, तसेच त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी, स्वतःचे विचार

स्पस्टपणे मांडण्यासाठी संभाषणाची कला येणे अवशयक आहे. विद्यार्थ्यांच्या इंग्रजी व मराठी संभाषणातील (उेपींशीीरींळेप) चुका कमी करणे किंवा त्या चुकावर लक्ष केंद्रित करणे व त्यावर उपायायोजना करणे हा या प्रकल्पाचा चा मुख्य उद्देश आहे.

**उद्देश :-**

१. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेची आवड निर्माण करणे.

२. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील साहित्याचा परिचय करून देणे.

३. भाषेचे महत्त्व समजावून देणे.

४. विद्यार्थ्यांच्या विचार क्षमतेला चालना देणे.

५. भाषेतील (इंग्रजी )संभाषणात जास्तीत जास्त कुशलता आणण्याचा प्रयत्न करणे.

६. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

७. विद्यार्थी इंग्रजी बोलताना ज्या चुका करतात त्या चुका कमी करण्याचा प्रयत्न करणे.

८. संभाषणात व्याकरणाचा, शब्दांचा (Vocabulary) योग्य उपयोग करणे.

९. संभाषणात व्याकरनदृष्ट्या होणाऱ्याचुका सुधारून, शुद्ध भाषेचा उपयोग करण्यास उत्तेजन देणे.

१०. संभाषणात व्याकरणाचे नियम व योग्य भाषा यांचा परिचय करून देणे.

११. विद्यार्थ्यांना आपले विचार स्पष्टपणे मांडण्यास संभाषणाद्वारे प्रेरणा देणे.

१२. इंग्रजी भाषेतील संभाषणात येणाऱ्या समस्या व त्याची कारणे शोधने व त्यांच्यावर उपाय शोधने.

**गृहितके :-**

१. विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलण्यात आवड नसणे.

२. विद्यालयात इंग्रजी संभाषणावर लक्ष दिले जात नसणे.

३. विद्यार्थ्यांच्या विचार शक्तीला चालना न दिली जाणे.

४. विद्यार्थ्यांच्या रचना क्षमतेला चालना न दिली जाणे.

५. विद्यार्थी इंग्रजी बोलताना नविन (Vocabulary) चा वापर न करणे.

६. विद्यालयात इंग्रजी बोलले जात नसणे.

७. विद्यार्थी व्याकरणदृष्ट्या शुद्ध इंग्रजी बोलत नसणे.

८. मराठी मध्यामातील मुलांना इंग्रजी बोलणे कठीण जाणे.

९. इंग्रजीतील Spelling, Pronunciation, Grammar विद्यार्थ्यांना कळत नसणे.

१०. विद्यार्थ्यांना आपले विचार इंग्रजीत मांडता येत नसणे.

११. संभाषणाद्वारे समाजात घडणाऱ्या घटनांकडे लोकांचे अवधान खेचून घेण्याच्या क्षमतेस चालना न देणे.

१२. विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषणाचे नियम व योग्य उच्चार याबद्दल माहिती नसणे.

१३. विद्यार्थ्यांच्या विकासाला चालना न देणे.

**व्याप्ती आणि मर्यादा :-**

हा प्रकल्प शालेय स्तरावरील पाचवी ते दहावी इयत्ता यातील संभाषणाच्या (इंग्रजी) समस्येशी संबंधित आहे .

१. हा प्रकल्प पाचवी ते दहावी च्या माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांचे इंग्रजी बोलणे सुधारण्याच्या दृष्टिने सीमीत आहे, आवश्यक आहे.

२. मर्यादित वेळेमुळे हा प्रकल्प मर्यादित स्वरूपाचा आहे.

३. मराठी माध्यमातील मुलांसाठी हा प्रकल्प मर्यादित आहे .

४. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देणे तसेच त्यांचे विचार प्रभावीपणे इंग्रजी संभाषणातून मांडण्यात प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने हा प्रकल्प मर्यादित आहे .

५. एम. ए. एज्युकेशन च्या द्वितीय वर्षाच्या पूर्तीसाठी शैक्षणिक वर्षात हा संशोधन प्रकल्प वेळेवर पुर्ण करणे आवश्यक आहे.

**व्याख्या :-**

भाषा : आपल्या मनातील भावना व विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय.

मराठी : मराठी हि महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. तसेच प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकण्याचे माध्यम आहे. व महाराष्ट्राच्या लोकांची मातृभाषा आहे.

इंग्रजी : इंग्रजी ही एक परकीय भाषा आहे. तसेच ती विश्व भाषा आहे. आज भारतामध्ये शासकीय कामकाजात इंग्रजी भाषेचा उपयोग केला जातो.

संभाषण : दोन व्यक्तीमधील विचार, मत, भावना यांचे आदान प्रदान Conversation is two way process Including Interaction and Feedback.

समस्या : एका क्षेत्रात काम करताना येणाऱ्या अडचणी.

**अभ्यासाचा आराखडा :-**

प्रस्तुत संशोधन साहित्याचा अभ्यास करण्यासाठी खालील प्रमाणे आराखडा निश्चित करण्यात आला. यामध्ये संशोधन व संबंधित संशोधन विषय याबाबतची माहिती मिळावी व अभ्यासाचे काम सुलभ व्हावे या उद्देशाने विद्यालयाचे, ग्रंथालय, प्राथमिक, व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व मुलांच्या मुलाखती, शिक्षण समीक्षा यातील आवश्यक भागांचा अभ्यास केला.

१. संशोधनासाठी अपेक्षित अशा सर्व विध्यार्थ्यांची यादी तयार केली.
२. विद्यार्थी व शिक्षक यांची मुलाखत घेऊन संकलित माहितीचे पृथ:करण करून निष्कर्ष काढले.
३. प्राप्त माहितीचे संकलन व पृथ:करण योग्य प्रकारे होण्यासाठी प्रश्नावली या तंत्राचा उपयोग केला.

**वापरलेली पध्दती :-**

शैक्षणिक संशोधनासाठी अनेक पद्धतीचा वापर केला जातो. त्यामध्ये ऐतिहासिक संशोधन, प्रायोगिक संशोधन इत्यादी पद्धतीचा वापर केला जातो. पण प्रस्तुत संशोधन हे वर्तमान परिस्थिती शी व चालू जीवनाशी निगडीत असल्याने या संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**सर्वेक्षण पद्धती :-**

शैक्षणिक संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती ही प्रमुख पद्धती होय. हि एक ऐतिहासिक पद्धती होय. ऐतिहासिक संशोधनात भूतकाळावर भर असतो. तर सर्वेक्षण पद्धतीत वर्तमान काळावर भर असतो. शाळेत शिकणाऱ्या मुलांची विशिष्ट विषयात कशी प्रगती आहे? अभ्यासक्रमाकडे पाहण्याचा शिक्षकाचा कोणता दृष्टीकोन आहे? शासनाकडून मिळणाऱ्या सावलतिचा विद्यार्थी कितपत उपयोग करतात? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न शिक्षकांना किंवा शाळा प्रमुखांना करावा लागतो. या सर्व प्रयत्नात विशिष्ट बाबतीत असलेली सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या संशोधन पद्धतीला सर्वेक्षण असे म्हणतात.

शिक्षण क्षेत्रात कोणतेही शोध कार्य करताना किंवा शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या समस्यावर उपाय शोधण्यात उपयोगात येणारी पद्धती म्हणजे सर्वेक्षण पद्धती. या पद्धतीमध्ये जास्तीत जास्त माहिती होते. आणि या पद्धतीत वर्तमान स्थितीला जास्तीत जास्त माहिती असते. प्रयोगशिलतेची व त्यातून अनुमान काढण्याची कृतीही यात आढळते. या दृष्टिने विचार करता सर्वेक्षण म्हणजे प्रचलित तत्वांचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण आणि मूल्यमापन असे म्हणता येईल. सर्वेक्षणातून खालील तीन प्रकारची माहिती संकलित केली जाते.

१. वर्तमान स्थिती.
२. अपेक्षित स्थिती.
३. आवश्यक साधनांचा बोध.

सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र कळते. कोणकोणत्या बाबी, कोणत्या स्थितीत उपलब्ध आहेत याची माहिती कळते. समस्या निराकरणकारीता कोणती स्थिती अपेक्षित आहे हे अन्य सर्वेक्षणाच्या आधारे कळते व ही अपेक्षित स्थिती प्राप्त करून समस्येची उकल करण्याकरीता कोणत्या साधनांची व प्रयत्नांची आवश्यकता आहे हे त्यामुळे कळते.

**साधने :-**

संशोधनात ज्या परिकल्पनांची आपण सुरुवात केलेली असते, त्या परिकल्पनांची मुल्यांकन करून अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते. तिला आपण संशोधनाची आधार सामुग्री म्हणतो. हि आधार सामुग्री विश्वासाहार्य, वैध असावी लागते. तिचे विश्लेषण व निर्वाचण करूनच आपण संशोधनांचे निष्कर्ष मांडत असतो. त्यासाठी गुणात्मक व परीणामात्मक अशा दोन्ही प्रकारची आधार सामुग्री आवश्यक असते. त्यासाठी विविध प्रकारची तंत्रे व पद्धती वापरल्या जातात. त्यांना आपण संशोधनाची साधने म्हणतो. आज उपलब्ध असलेली साधने म्हणतो. आज उपलब्ध असलेली संशोधनाची साधने पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. निरीक्षण २. मुलाखती ३. प्रश्नावली ४. अभिवृत्ती भाषिक चाचण्या

५. शोधिका ६. पडताळा सूची ७. पदनिश्चयन श्रेणी ८. अंकपत्र

९. प्रमाणित चाचण्या १०. प्रेक्षपनशील तंत्रे ११. समाजनीती

संशोधनकार्यात अन्वेषणाला या सर्वच साधनांच्या, आवश्यकतेनुसार उपयोग करावा लागतो. हा प्रकल्प तयार करताना प्रश्नावली या साधनांचा उपयोग केला आहे. तसेच या प्रकल्पासाठी मुलाखती या साधनांचा उपयोग केला आहे.

**नमुना निवड :-**

मी काही माध्यमिक शाळांचे इंग्रजी संभाषणात येणाऱ्या अडचणी शोधण्यासाठी सर्वेक्षण केले. काही ग्रामीण शाळेत असे आढळून आले कि, त्यांच्या शाळांमध्ये अनुभवी शिक्षक नसल्यामुळे योग्य ते मार्गदर्शन न मिळाल्यामुळे त्यांना अशा समस्यांना सामोरे जावे लागते. त्यानंतर काही शहरी शाळांचे सर्वेक्षण केले. ते करताना असे आढळले कि, योग्य ते मार्गदर्शन मिळाल्यामुळे इंग्रजी संभाषणात जास्त समस्या येत नाहीत. विद्यार्थी इंग्रजी बोलू शकतात. यासाठी मी काही मुलाखती घेतल्या, त्यासाठी मी परळी वैजनाथ परिसरातील पाच मराठी शाळांची निवड केली आहे. शाळेतील विषयांशी संबधित शिक्षकांच्या मुलाखती व ७वी ते १०वी वर्गातील मुलांची निवड केली. व त्यांना प्रश्नावलीतील प्रश्न विचारले. अशा प्रकारे मी शिक्षकांची व विद्यार्थ्यांची निवड केली.

१. संशोधनासाठी अपेक्षित अशा मुलांसाठी प्रश्नावली तयार केली.

२. शिक्षण व विद्यार्थी यांच्या मुलाखती घेण्यासाठी पाच शाळांना भेट देण्यासाठी व आवश्यक अशी चर्चा करण्यासाठी कार्यक्रम निश्चित केला.

३. प्राप्त माहितीचे संकलन व पृथ:करण योग्य प्रकारे होण्यासाठी कार्यक्रम निश्चित केला.

**संशोधन पद्धती :-**

या विषयांच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे .

**माहितीचे पृथ:करण :-**

आपला भारत देश हा बहुभाषिक देश आहे तसेच इंग्रजी भाषेला भारतात तिसरे स्थान दिले गेले आहे. यासाठी इंग्रजीचा अभ्यास सर्वच विद्यालयात करणे आवश्यक आहे. इंग्रजी विषयाचा अभ्यास आज १ली ते १०वी इयत्तेपर्यंत अभ्यासने आवश्यक आहे. ई. स. १९८६ च्या शिक्षणनिती प्रमाणे महाराष्ट्र राज्य प्राथमिक एवं माध्यमिक शिक्षण मंडळाने पाठ्यक्रम तयार केला. आणि त्यात इंग्रजी भाषेला तृतिय स्थान दिले गेले आहे. शिक्षणक्रमामध्ये ज्या भाषा अंतर्भूत आहेत त्यात इंग्रजी तीसऱ्या स्थानावर आहे. त्याचप्रमाणे ५वी ते १०वी पर्यंतच्या वर्गाना इंग्रजी हे तीसऱ्या स्थानावर मानले आहे.

शालेय स्तरावर इंग्रजी शिकवणे आवश्यक मानले गेले आहे. कारण इंग्रजी परकीय भाषा असली तरी भारतात व परदेशांशी बरेचशे व्यवहार हे इंग्रजीतून चालतात यासाठी विद्यालयामध्ये लेखन, वक्तृत्त्व स्पर्धा, निबंधलेखन अशा अनेक प्रकारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले जाते संभाषण कला हि जीवनातील सर्व स्तरावर उपयोगी पडणारी कला आहे. प्रत्येक ठिकाणी आपल्याला संभाषणाचा उपयोग करावा लागतो. काही ठिकाणी इंग्रजी तून आपले विचार मांडावे लागतात. तर काही ठिकाणी मराठीतून अपले विचार मांडावे लागतात. शालेय अभ्यासक्रमात इंग्रजी संभाषण शिकल्यामुळे त्याचा उपयोग त्यांना व्यावहारिक जीवनात करता येतो. व ते व्याकरणिक दृष्ट्या शुद्ध व नियमाप्रमाणे संभाषण करतात. त्यामुळे ते कोणत्याही चुका करीत नाही यामुळे विद्यार्थ्यांची सृजनक्षमता, अस्सखलीतपणा वाढतो. तसेच आपले विचार प्रगत करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये येते.

विद्यार्थ्यांच्या संपूर्ण विकासासाठी त्यांना संभाषण ही कला येणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ती व्याकरणिक दृष्ट्या व नियमांना अनुसरून बोलणे आवश्यक आहे. आणि यासाठी शिक्षकांचे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**शिक्षक प्रश्नावलीवरून काढलेले निष्कर्ष :-**

संशोकधकाने इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषणात येणाऱ्या अडचणी / समस्या हा विषय संशोधनास निवडला आहे. त्यानंतर काही शाळांमध्ये जाऊन तेथील शिक्षक व विद्यार्थी यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला या विषया संदर्भात मिळालेली माहिती त्याचे पृथ:करण खाली दिले आहे.

**शक्षक - प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे पृथ:करण :-**

**इंग्रजी विषयात सर्व विद्यार्थी पास होत नाही.**

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| इंग्रजी विषयाबद्दल आवड | आवडतो | ५ | १००% |
| | आवडत नाही | ० | ०% |

**इंग्रजी विषय १०० % शिक्षकांना अध्यापनास आवडतो.**

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| विद्यार्थी इंग्रजी विषय आवडीने शिकतात का ? | शिकतात | ३ | ६०% |
| | शिकत नाही | २ | ४०% |

इंग्रजी विषय ६० % विद्यार्थी आवडीने शिकतात.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांना भाषेची अडचण येते का? | येतो | ५ | १०० % |
| | येत नाही | ० | ०% |

१००% विद्यार्थ्यांना भाषेची अडचण येते.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| इंग्रजी संभाषणात आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करता का ? | करतात | ५ | १०० % |
| | करत नाही | ० | ० % |

इंग्रजी संभाषणात आवड निर्माण करण्यासाठी १०० % प्रयत्न करतात.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| इंग्रजी प्रकट वाचन करून घेता का? | हो | ५ | १०० % |
| | नाही | ० | ०% |

दर आठवड्याला इंग्रजीचे प्रकट वाचन करून घेतात.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| विद्यार्थी संभाषणात चुका करतात का? | करतात | ५ | १०० % |
| | करीत नाही | ० | ०% |

१००% विद्यार्थी संभाषण करताना चुका करतात.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| विद्यार्थी व्यावहारिक जीवनात इंग्रजी संभाषणाचा उपयोग करतात का? | करतात | ४ | ८०% |
| | करीत नाही | १ | २०% |

२०% विद्यार्थी व्यावहारिक जीवनात इंग्रजी संभाषणाचा उपयोग करीत नाही.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| इंग्रजी वाचनाचा, बोलण्याचा विद्यार्थ्यांचा सराव होतो का? | होतो | ५ | १०० % |
| | होत नाही | ० | ०% |

इंग्रजी वाचनाचा, बोलण्याचा विद्यार्थ्यांचा १००% सराव होतो.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| इंग्रजी विषयात सर्व विद्यार्थी पास होतात का? | होतात | ० | ०% |
| | होत नाही | ५ | १०० % |

**शिक्षकांच्या प्रश्नावालीवरून काढलेले निष्कर्ष :-**

१. शिक्षक विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाचे वाचन घेतात. पण त्यात नियमितपणा नसतो.
२. इंग्रजी संभाषणाचा विद्यार्थ्यांकडून जास्त सराव करून घेतला जात नाही.
३. संभाषणाचे नियम तसेच इंग्रजीतील व्याकरण विद्यार्थ्यांना समजले का? नाही याकडे दुर्लक्ष केले जाते.
४. शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवलेला भाग प्रत्यक्ष जाणून न घेता तो समाजला असे गृहीत धरून पुढचा भाग शिकविण्यास घेतात.
५. वर्ग अध्यापानाच्या वेळेत सर्व शिक्षक शैक्षणिक साहित्याचा वापर करत नसल्याने त्याचा अध्यापनावर अयोग्य परिणाम होतो.

**विद्यार्थ्यांच्या प्रश्नावालीवरून काढलेले निष्कर्ष :-**

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| तुम्हाला इंग्रजी विषय आवडतो का? | आवडतो | १० | ४० % |
| | आवडत नाही | १५ | ६० % |

६०% विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय आवडत नाही, तर ४०% विद्यार्थ्यांना आवडतो.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचता येते का ? | येते | २५ | १०० % |
| | येत नाही | -- | ० % |

१००% विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचता येते.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलता येते का? | येते | २५ | १०० % |
| | येत नाही | -- | ० % |

१००% विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलता येते.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषणाचे नियम माहित आहे का ? | माहित आहेत | १५ | ६० % |
| | माहित नाहीत | १० | ४० % |

४०% विद्यार्थ्यांना संभाषणाचे नियम माहित नाहीत,
६०% विद्यार्थ्यांना माहित आहेत.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| शाळेत शिकलेल्या इंग्रजी संभाषणाचा उपयोग करता येतो का? | येतो | १२ | ३६% |
| | येत नाही | १३ | ६४% |

६४ % विद्यार्थ्यांना शाळेत शिकलेल्या इंग्रजी संभाषणाचा उपयोग करता येत नाही, ३६ % विद्यार्थ्यांना शाळेत शिकलेल्या इंग्रजी संभाषणाचा उपयोग करता येतो.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| व्यावहारिक जीवनात इंग्रजी बोलता का ? | हो | ३ | १२ % |
| | नाही | २२ | ८८% |

१२% विद्यार्थी व्यवहारिक जीवनात इंग्रजी बोलतात,
८८% विद्यार्थी बोलत नाहीत.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| इंग्रजी बोलताना अडचणी येतात का? | येतात | १५ | ६०% |
| | येत नाही | १० | ४०% |

६०% विद्यार्थ्यांना अडचणी येतात, ४०% विद्यार्थ्यांना अडचणी येत नाही.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| आलेल्या अडचणी शिक्षक सोडवतात का? | सोडवतात | २५ | १००% |
| | सोडवत नाही | ० | ० % |

१०० % शिक्षक आलेल्या अडचणी सोडवतात.

| तपशील | प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| इंग्रजी विषय अवघड वाटतो का? | वाटतो | १३ | ६४ % |
| | वाटत नाही | १२ | ३६ % |

३६ % विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय अवघड वाटत नाही, ६४ % विद्यार्थ्यांना अवघड वाटतो .

**विद्यार्थ्यांच्या प्रश्नावालीवरून काढलेले निष्कर्ष :-**

१. सरासरी ७० % विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची आवड नाही .
२. विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाकडे दुर्लक्ष, याचे कारण इंग्रजी भाषा हि आवघड आहे, त्यामुळे भाषेकडे दुर्लक्ष असते.
३. इंग्रजी शिकलेल्याचा व्यावहारिक जीवनात उपयोग पाहिजे तेवढा करत नाहीत.
४. इंग्रजी बोलण्याचा सराव करत नसल्यामुळे अभ्यास परीक्षेपुरता मर्यादित राहतो.

**सारांश व शिफारशी :-**

आजच्या बदलत्या काळात शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. इंग्रजी तसेच भाषा विषयाकडे विद्यार्थ्यांचा विचार शक्तीचा, कल्पना शक्तीचा, तर्कशक्तीचा, वक्तृत्व गुणांचा व लेखन कौशल्याचा विकास करण्याचे साधन म्हणुन पहिले जाते

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाराष्ट्र राज्यात माध्यमिक शिक्षण अभ्यासक्रम तयार करण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपाय योजना केल्या गेल्या. निबंधलेखन, वक्तृत्व, पत्रलेखन अशा अनेक प्रकारे त्यांच्या गुणांना वाव देण्यात आला आहे.

संभाषण हा खरा अभ्यासाचा विषय नाही. ती जीवनातील नित्याची गोष्ट आहे. संभाषण म्हणजे दोन व्यक्तीतील विचार, मते, भावना यांचे आदान-प्रदान. संभाषण म्हणजे मौखिक गप्पा, संभाषण हि एक आयुष्यभर पुरणारी उपयुक्त गोष्ट आहे. चांगले संभाषण हे बोलणाऱ्याला व ऐकणाऱ्याला या दोघांनाही आनंद देणारी कला आहे.

संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. त्यात प्रश्नावली पद्धतीचा वापर करून निरीक्षण व सूक्ष्म वाचन करून मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष व शिफारशी मांडल्या आहेत.

**सारांश :-**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना सर्व प्रकारचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संभाषण हि एक कला आहे. माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलण्यात येणाऱ्या समस्या यांचा अभ्यास करताना शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन कमी प्रमाणात देतात. इंग्रजी बोलण्याचा सराव कमी प्रमाणात असतो. त्यामुळे विद्यार्थी व्याकरणिक चुका करतात.

शिक्षक त्यांना सुधारित नियमाबद्दल माहिती देतात, त्यामुळे विद्यार्थी इंग्रजीचा व्यावहारिक जीवनात उपयोग करू शकतो.

**शिफारशी :–**

मराठी माध्यमातील मुलांना इंग्रजी बोलताना येत असलेल्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास या संशोधन प्रकल्पानुसार विद्यार्थ्यांना इंग्राजी बोलण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी खालील उपाय योजना केल्या पाहिजे.

१. विद्यार्थ्यांच्या शुद्ध बोलण्याकडे लहानपणापासून लक्ष देणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांच्या विचार शक्तीला प्रेरणा देण्यासाठी त्यांच्याकडून कहानीलेखन, निबंधलेखन, वक्तृत्व, इत्यादी लहानपणापासून शिकवले पाहिजे, करून घेतले पाहिजे.

३. प्रत्येक इयत्तेत इंग्रजी बोलण्याचा सराव करून घेतला पाहिजे.

४. प्रत्येकवेळी बोलण्यात येणऱ्या चुका विद्यार्थ्यांना दाखवून दिल्या पाहिजेत.

५. विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलण्याच्या नियमांची ओळख करून दिली पाहिजे.

६. विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त इंग्रजी बोलण्याचा सराव करून घेतला पाहिजेत.

७. प्रत्येक विद्यार्थ्याकडे शिक्षकाचे व्यक्तिगत लक्ष असले पाहिजे.

८. विद्यार्थ्यांच्या व्याकरणिक चुका, शुद्धलेखनाच्या चुका तसेच नियमातील चुका समजावून दिल्या पाहिजेत.

९. संभाषण हि एक कला आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा उपयोग त्यांच्या व्यावहारिक जीवनात करून घेतला पाहिजे.

**समारोप :–**

कोणत्याही भाषेवर प्रभुत्त्व मिळविण्यासाठी संभाषण कला आवश्यक आहे. या दृष्टिने विद्यार्थ्यांना येत असलेल्या समस्या व त्यावरील उपाय शिक्षक व विद्यार्थी यांना दिल्या गेलेल्या प्रश्नावालीवरून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यातील समस्यांची माहिती होणे आवश्यक आहे.

**शिक्षक मुलाखत प्रश्नावली :–**

१. आपण कोणते विषय शिकविता व कोणत्या वर्गांना ?
२. आपल्याला इंग्रजी विषय अध्यापन करण्यास आवडतो का ? आपल्या बी. एड. / एम. एड. च्या मेथड कोणत्या होत्या ?
३. इंग्रजी विषयाच्या वर्गाला सर्व विद्यार्थी हजर असतात का ?
४. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाबद्दल अभिरुची आहे का ? नसल्यास कारणे कोणती ?
५. विद्यार्थी वर्गामध्ये इंग्रजीतून संभाषण करतात का ? नसल्यास का करत नाहीत ?
६. विद्यार्थ्यांना व्याकरणाबद्दल आवड आहे का ? नसल्यास का नाही ?
७. तुम्ही इंग्रजी शिकविताना कोणत्या शैक्षणिक साधनांचा वापर करतात ?
८. विद्यार्थी तुम्हाला त्यांच्या समस्या विचारतात का ? नसल्यास का विचारात नाहीत ?
९. तुम्ही त्यांच्या शंकांचे निरसन करता का ?
१०. आपण विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी बोलण्याची रुची वाढविण्यासाठी कोणकोणते प्रयत्न करता ?
११. विद्यार्थी इंग्रजी बोलताना कोणत्या चुका करतात ?
१२. तुम्ही विद्यार्थ्यांकडून इंग्रजीचे प्रकट वाचन करून घेतात का ?
१३. आठवड्यातून किती वेळा तुम्ही इंग्रजीचे प्रकट वाचन करून घेता ?
१४. विद्यार्थी इंग्रजी वाचताना कोणत्या चुका करतात व का ?
१५. विद्यार्थी परीक्षेत व्यवस्थित डशिश्रश्रळपस, ड्शर्पीशपलश, त्रीरारी लिहितात का ?
१६. विद्यार्थी व्यावहारिक जीवनात इंग्रजीचा वापर करतात का ?
१७. इंग्रजी विषयात सर्व विद्यार्थी पास होतात का ?

**विद्यार्थी मुलाखत प्रश्नावली :–**

१. तुम्ही शाळेत कोणकोणत्या भाषा शिकता ? (विषय )
२. तुम्हाला कोणती भाषा आवडते ?
३. तुम्हाला इंग्रजी विषय आवडतो का ? नसल्यास का ?
४. इंग्रजी विषय तुम्ही कोणत्या इयत्तेपासून शिकत आहात ?
५. इंग्रजी विषयासाठी तुमच्या शाळेने तुमच्या इयत्तेला किती तास ठेवले आहेत ?

६. इंग्रजी विषय शिकवताना शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करतात का ?
७. तुम्हाला इंग्रजी वाचता येते का ?
८. शिक्षक वर्गात अध्यापन करताना तुम्हाला इंग्रजी वाचायला सांगतात का ?
९. तुम्हाला इंग्रजी बोलता येते का ? (व्यवहारात )
१०. इंग्रजी व्याकरणाचे, उच्चाराचे नियम तुम्हाला माहित आहेत का ?
११. तुम्ही तुमच्या मित्र मैत्रिणीशी इंग्रजीतून बोलतात का ?
१२. शाळेत शिकलेल्या इंग्रजीचा तुम्हाला व्यवहारात उपयोग होतो का ?
१३. तुम्हाला इंग्रजी बोलताना कोणत्या अडचणी येतात ?
१४. तुम्हाला आलेल्या अडचणी शिक्षक सोडवतात का ?
१५. तुम्ही इंग्रजी बोलणे सुधारण्याचा प्रयत्न करतात का ?

**संदर्भ सूची :-**

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण पुस्तिका, भारत सरकार (१९८६).
२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील राज्याने स्वीकारलेल्या शिफारशी, महाराष्ट्र राज्य (१९८६).
३. भारतीय शिक्षण आयोग ( जानेवारी १९९४ ) - प्रा. यु. व्ही. कांबळे.
४. भारतीय शिक्षण ( जानेवारी १९९५ ) - प्रा. आर. ए. कुंभार.

मानवी संस्कृतीचा सगळ्यात मोठा वारसा म्हणजे त्याची मातृभाषा होय. पिढ्यान्‌पिढ्यांचे भरण पोषण करण्याचे सामर्थ्य भाषेत आहे. आजच्या वेगवान काळात जागतिकीकरणामुळे भाषेसंदर्भात काही गंभीर प्रश्न निश्चितच निर्माण झाले आहेत. सर्वच घटकांवर, समाजजीवनावर वेगवेगळे परिणाम होत आहेत. भाषा-संस्कृती यावरील बदलांचा विचार केला तर आणखी पन्नास वर्षांनी काय चित्र असेल याची कल्पना येते. जगात इंग्रजी शिवायही प्रगती करणारे देश आहेत. याचा मानसिक पातळीवर खोलवर विचार होणे गरजेचे वाटते. भटक्या, आदिवासी, उपेक्षित वंचित समुहाच्या भाषा जगभर वेगाने नामशेष होत आहेत. अवाजवी पद्धतीने इंग्रजी भाषा सर्मथक अर्धवटपणे तिचे सर्मथन करून सांस्कृतिक-भाषिक जगतात धुमाकुळ घालत आहेत. अमुक एक भाषा श्रेष्ठ, दुसरी भाषा कनिष्ठ ही न्यूनगंडाची भावना लोकसमुहाने सोडली पाहिजे. मराठी भाषेच्या बाबतीतही ठोस धोरणे शासकीय पातळीवर राबविली जात नाहीत. कायदा, वैद्यकीय, अभियांत्रिकी, न्यायालयीन इ. क्षेत्रात पूर्णपणे मराठीत ज्ञानकार्य करण्यात मोठ्या प्रमाणावर शासकीय यंत्रणेला अपयश आलेले आहे. त्यामुळे मराठीची ससेहोलपट सुरुच आहे. जागतिकीकरणात आर्थिक लाभ, सत्ता, अनियंत्रित नफेखोरी यांना महत्तव असते. त्यामुळे या जीवघेण्या स्पर्धेत मराठीला सर्वोच्च ज्ञानभाषा बनविण्यास अग्रक्रम दिला पाहिजे.

महाराष्ट्रातील विविध भागातील समृद्ध बोली, मौखिक परंपरांचे डोळसपणे जतन करून त्यांचे संशोधन व संवर्धन आवश्यक आहे. त्यामुळे मराठी भाषेला बळकटी येईल. मराठी समुहाला भाषेच्या आकलनाबाबत मानसिकदृष्ट्या कणखर बनविणे, भाषिक न्यूनत्वाची वाढ होऊ न देणे, वाचन, मनन, लेखन व स्वत:ला व्यक्त होण्याची सतत धडपड करत राहणे या प्रयत्नांनी जागतिकीकरणाच्या, उदारीकरणाच्या रेट्यात मराठी भाषा नुसती टिकणार नाही तर ती समृद्धही होईल. श्रीचक्रधरस्वामी, ग्यानबा-तुकोबाची ही श्रीमंत जनभाषा जतन करण्याची, वाढविण्याची, टिकविण्याची जबाबदारी आताच्या व येणाऱ्या पिढ्यांवर आहे. प्रामाणिकपणे सर्वांनी प्रयत्न केले तर जागतिकीकरणात मराठी भाषा स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व राखेल.

- प्रा. उत्तम सुपारे
मराठी विभाग प्रमुख

